# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## दिनांक २६/०३/२०२४ (मंगळवार) सायंकाळ

---

### पो.स्टे. केळवद हद्दीमधील कवठा शिवार येथील जुगार अड्डयावर धाड

### —: नागपुर ग्रामीण पोलीसांची कारवाई :—

दिनांक २६/०३/२०२४ पोलीस स्टेशन केळवद येथील स्टाफ अवैध धंद्यावर रेड संबंधाने पेट्रोलिंग करीत असतांना मुखबिरद्वारे खात्रीलायक खबर मिळाली की, कवठा शिवारातील एका टेकडीवर काही इसम ५२ तासपत्त्यावर पैशाची बाजी लावुन हारजीतचा जुगार खेळत असल्याची माहीती प्राप्त झाले वरून सदर स्टाफने कवठा शिवारातील एका टेकडीवर जुगार रेड केली असता **आरोपी नामे— १) रामेश्वर श्यामराव चांदेकर, वय ४१ वर्ष, रा. कवठा, २) निलेश धनराज हजारे, वय ४० वर्ष, रा. केळवद, ३) रुदेश उर्फे शुभम रविन्द्र मोहोड, वय २८ वर्ष, रा. कवठा, ४) दिलीप श्यामराव निकोसे वय ५४ वर्ष, रा. कवठा ५) राजेश अशोक पटटे, वय २१ वर्ष, रा. सावंगा ६) पवन ज्ञानेश्वर भिवनकर, वय २३ वर्ष रा. कवठा ७) विवेक गंगाधर बाळापुरे, वय २४ वर्ष, रा. कवठा ८) अंकित वसंतराव गिरडकर, वय ३० वर्ष रा. केळवद ९) मिलींद धनराज सातघरे, वय ३० वर्ष, रा. केळवद १०) पियुष गजानन तुरणकर, वय १८ वर्ष रा. केळवद, ११) मुकेश शिवाजी भोजने वय ३७ वर्ष, रा. कवठा १२) योगेश देवीदास अंबरते, वय ३१ वर्ष रा. कवठा** हे जुगार खेळतांनी मिळुन आले. एकुण १२ जुगारी इसम यांना ताब्यात घेवुन त्यांचे ताब्यातुन १) एम.एच ४०, बी. पी ९२३५ हीरो फॅशन प्रो कंपनीची मो.सा. किमंती ५०,०००/रु ,२) स्पेन्डर मो.सा. क्र एम. एच ४०, ए. जी १८४१ किमंती ६०,०००/— रु., ३)हीरो स्पेन्डर कंपनीची मो.सा. क्र एम. एच ४०, बी. यु ०४९७ किमंती ६०,०००/— रु. असा एकुण तीन मो.सा. किंमती १,७०,०००/रु व वरील नमुद आरोपीच्या अंगझडतीत नगदी १०,३३०/—रु व वेगवेगळया कंपनीचे मोबाईल किमंती १,१२,०००/रु व ५२ तास पत्ते किमंती ५०/—रु असा एकुण २,९२,३८०/— रूपयाचा मुद्देमाल जप्त करून आरोपीतांविरूध्द पोलीस ठाणे केळवद कलम १२ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनात पोस्टे केळवद येथील ठाणेदार सपोनि राकेश साखरकर, पोलीस उपनिरीक्षक गेडाम, ग्रेड पोलीस उपनिरीक्षक अमरदीप कामठे, पोलीस हवालदार मोरेश्वर चलपे, सहायक फौजदार संदीप नागरे, पोलीस नायक प्रकाश ठोके, पोलीस अंमलदार सचिन सलामे, धोंडुतात्या देवकते, पोलीस हवालदार गुणवंता डाखोळे, पोलीस अंमलदार कुलकर्णी, उईके, मपोहवा किरण भगत यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर